महाराष्ट्र राज्य आरोग्य सेवा व वैद्यकीय शिक्षण प्रशासकीय अधिकारी संघटना, जे. जे. समुह रुग्णालय, मुंबई ४०० ००८.

या संघटनेस शासन मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक-आरजीए-१०९१/३१५/सीआर-१०/१६-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक:- १९/२/१९९१.

वाचा:- १. सहसंचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई ४०० ००१ या दिनांक ११.१०.८९ चे पत्र.

२. महाराष्ट्र राज्य आरोग्य सेवा व वैद्यकीय शिक्षण प्रशासकीय अधिकारी संघटना, मुंबई-८ यांचे दिनांक ३१.८.८९ चे पत्र.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र नागरी सेवा [वर्तणुक] नियम, १९७९ मधील नियम २९ च्या अधीन राहून "महाराष्ट्र राज्य आरोग्य सेवा व वैद्यकीय शिक्षण प्रशासकीय अधिकारी संघटना" जे. जे. समुह रुग्णालय, मुंबई-४०० ००८ हया महाराष्ट्र राज्य वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयातील प्रशासकीय अधिकारी संवर्गातील शासकीय औद्योगिकेत्तर कर्मचाऱ्यांच्या संघटनेस शासन मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[प्र. म. देवभानकर]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. सहसंचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, मुंबई ४०० ००१.
२. जिल्हाधिकारी मुंबई,
३. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य आरोग्य सेवा व वैद्यकीय शिक्षण प्रशासकीय अधिकारी संघटना, जे. जे. समुह रुग्णालय, मुंबई ४०० ००८ [२ जादा प्रती]
४. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
६. [illegible] मंत्रालयीन विभाग,
७. कक्ष अधिकारी सहायक,
८. निवड नस्ती.